सत्यमेव जयते

UPSC

# नागरी सेवा परीक्षा स्वरुप

## संपादन


## ज्ञानेश्वर जाधव

(JRF, NET Political Science)



contact@upscinmarathi.com 9921611101 upscinmarathi.com

# नागरी सेवा परीक्षा स्वरूप

## भाग - १: नागरी सेवा परीक्षेची योजना

**1. नागरी सेवा परीक्षेत सलग दोन टप्पे असतात:**

(i) नागरी सेवा (मुख्य) परीक्षेसाठी उमेदवारांच्या निवडीसाठी नागरी सेवा (पूर्व) परीक्षा (बहुपर्यायी प्रश्न);

(ii) विविध सेवा आणि पदांसाठी उमेदवारांच्या निवडीसाठी नागरी सेवा (मुख्य) परीक्षा (लेखी आणि मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी).

2. नागरी सेवा (पूर्व) परीक्षेत वस्तुनिष्ठ प्रकारच्या (बहुपर्यायी प्रश्न) दोन पेपर असतील आणि जास्तीत जास्त ४०० गुण असतील. ही परीक्षा केवळ स्क्रीनिंग टेस्ट म्हणून काम करण्यासाठी आहे; नागरी सेवा (मुख्य) परीक्षेत प्रवेशासाठी पात्र घोषित केलेल्या उमेदवारांनी नागरी सेवा (पूर्व) परीक्षेत मिळवलेले गुण त्यांच्या गुणवत्तेचा अंतिम क्रम निश्चित करण्यासाठी मोजले जाणार नाहीत. नागरी सेवा (मुख्य) परीक्षेत प्रवेश घ्यायच्या उमेदवारांची संख्या या परीक्षेद्वारे वर्षभरात भरल्या जाणाऱ्या एकूण रिक्त पदांच्या अंदाजे संख्येच्या सुमारे बारा ते तेरा पट असेल. ज्या उमेदवारांना आयोगाने त्या वर्षी नागरी सेवा (पूर्व) परीक्षेत पात्र घोषित केले आहे, तेच उमेदवार त्या वर्षीच्या नागरी सेवा (मुख्य) परीक्षेत प्रवेशासाठी पात्र असतील.

**टीप १:** आयोग नागरी सेवा (मुख्य) परीक्षेसाठी पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची यादी तयार करेल. नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर-२ मध्ये किमान ३३% गुण आणि नागरी सेवा (पूर्व) परीक्षेच्या सामान्य अध्ययन पेपर-१ चे एकूण पात्रता गुण आयोगाने निश्चित केल्यानुसार असतील.

**टीप २:** खाली दिलेल्या तपशीलांनुसार चुकीच्या उत्तरांसाठी नकारात्मक गुण असतील:

i. प्रत्येक प्रश्नाच्या उत्तरांसाठी चार पर्याय आहेत. उमेदवाराने चुकीचे उत्तर दिलेल्या प्रत्येक प्रश्नासाठी, त्या प्रश्नाला दिलेल्या गुणांपैकी एक तृतीयांश (०.३३) गुण दंड म्हणून वजा केले जातील.

ii. जर एखाद्या उमेदवाराने एकापेक्षा जास्त उत्तरे दिली, तर दिलेल्या उत्तरांपैकी एक जरी बरोबर असले तरीही ते चुकीचे उत्तर मानले जाईल आणि त्या प्रश्नासाठी वरीलप्रमाणे दंड असेल.

iii. जर एखादा प्रश्न रिकामा सोडला गेला म्हणजेच उमेदवाराने कोणतेही उत्तर दिले नाही, तर त्या प्रश्नासाठी कोणताही दंड आकारला जाणार नाही.

UPSC IN मराठी ··· स्वप्नपूर्ती मातृभाषेतन ···

1. नागरी सेवा (मुख्य) परीक्षेत लेखी परीक्षा आणि मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी असेते. लेखी परीक्षेत पारंपारिक निबंध प्रकारातील ९ पेपर असतील, ज्यापैकी दोन पेपर पात्रता स्वरूपाचे असतील. सर्व अनिवार्य पेपर (पेपर-१ ते पेपर-७) साठी मिळालेले गुण आणि मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीमध्ये मिळालेले गुण रँकिंगसाठी मोजले जातील.
2. नागरी सेवा (मुख्य) च्या लेखी भागात आयोगाने त्यांच्या विवेकबुद्धीनुसार निश्चित केलेल्या किमान पात्रता गुण मिळविणाऱ्या उमेदवारांना मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलावले जाईल. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीसाठी बोलावल्या जाणाऱ्या उमेदवारांची संख्या भरायच्या रिक्त जागांच्या संख्येच्या दुप्पट असेल. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीमध्ये २७५ गुण असतील (किमान पात्रता गुण नसतील).
3. उमेदवारांना नागरी सेवा (मुख्य) परीक्षेत (लेखी भाग तसेच मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी) मिळालेले गुण त्यांची अंतिम क्रमवारी निश्चित करतील. उमेदवारांना परीक्षेतील त्यांच्या श्रेणी आणि विविध सेवा आणि पदांसाठी त्यांनी व्यक्त केलेल्या पसंती लक्षात घेऊन विविध सेवांमध्ये नियुक्त केले जाईल.

## भाग–२: पूर्व आणि मुख्य परीक्षेसाठी योजना आणि विषय

### अ. पूर्व परीक्षा

- परीक्षेत प्रत्येकी २०० गुणांचे दोन अनिवार्य पेपर असतील.

**टीप:**

i. दोन्ही पेपर वस्तुनिष्ठ प्रकारचे (बहुपर्यायी प्रश्न) असतील आणि प्रत्येकी 'दोन तासांचा कालावधी' असेल.
ii. नागरी सेवा (पूर्व) परीक्षेचा सामान्य अध्ययन पेपर-II हा पात्रता पेपर असेल, ज्यासाठी किमान पात्रता गुण ३३% निश्चित केले असतील.
iii. प्रश्नपत्रिका हिंदी आणि इंग्रजी दोन्ही भाषेत असतील.
iv. अभ्यासक्रमाची माहिती बघण्यासाठी पुढील लिंकवर क्लिक करा -

### ब. मुख्य परीक्षा

- **लेखी परीक्षेत खालील पेपर असतील:**

| | | |
|---|---|---|
| | **पात्रता पेपर:** | |
| **पेपर - अ:** | घटनेच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या २२ भाषांमधून उमेदवाराने निवडलेल्या भारतीय भाषेपैकी एक | **३०० गुण** |
| **पेपर - ब:** | इंग्रजी | **३०० गुण** |
| | **गुणवत्तेसाठी मोजले जाणारे पेपर:** | |
| **पेपर - १:** | निबंध | **२५० गुण** |
| **पेपर - २:** | **सामान्य अभ्यास-१** (भारतीय वारसा आणि संस्कृती, जग आणि समाजाचा इतिहास आणि भूगोल) | **२५० गुण** |
| **पेपर - ३:** | **सामान्य अभ्यास-२** (शासन, संविधान, राजकारण, सामाजिक न्याय आणि आंतरराष्ट्रीय संबंध) | **२५० गुण** |
| **पेपर - ४:** | **सामान्य अभ्यास-३** (तंत्रज्ञान, आर्थिक विकास, जैवविविधता, पर्यावरण, सुरक्षा आणि आपत्ती व्यवस्थापन) | **२५० गुण** |
| **पेपर - ५:** | **सामान्य अभ्यास-४** (नीतिशास्त्र, सचोटी आणि अभियोग्यता) | **२५० गुण** |
| **पेपर - ६:** | वैकल्पिक विषय - पेपर १ | **२५० गुण** |
| **पेपर - ७:** | वैकल्पिक विषय - पेपर २ | **२५० गुण** |
| **लेखी चाचणी एकूण** | | **१७५० गुण** |
| **व्यक्तिमत्व चाचणी** | | **२७५ गुण** |
| **एकूण** | | **२०२५ गुण** |

उमेदवार खाली दिलेल्या (**मुख्य परीक्षेसाठी वैकल्पिक विषयांची यादी**) विषयांच्या यादीतून कोणताही एक वैकल्पिक विषय निवडू शकतात:-

**टीप:**

i. भारतीय भाषा आणि इंग्रजी भाषा विषयावरील पेपरसाठी (पेपर अ आणि पेपर ब) मॅट्रिक्युलेशन किंवा समकक्ष-मानक असतील आणि हे पेपर पात्रता स्वरूपाचे असतील. या पेपर्समध्ये मिळालेले गुण 'रँकिंग'साठी मोजले जाणार नाहीत.

ii. सर्व उमेदवारांच्या 'निबंध', 'सामान्य अभ्यास' आणि वैकल्पिक विषय या पेपर्सचे मूल्यांकन 'भारतीय भाषा' आणि 'इंग्रजी' या विषयांच्या पात्रता पेपर्सच्या मूल्यांकनासोबतच केले जाईल. परंतु केवळ अशा उमेदवारांच्या निबंध, सामान्य अभ्यास आणि वैकल्पिक विषयावरील पेपर्सची दखल घेतली जाईल, ज्यांनी या पात्रता पेपर्समध्ये 'भारतीय भाषा'मध्ये २५% आणि इंग्रजीमध्ये २५% गुण किमान पात्रता मानके म्हणून मिळवले असतील.

iii. तथापि, अरुणाचल प्रदेश, मणिपूर, मेघालय, मिझोराम, नागालँड आणि सिक्कीम या राज्यांमधील उमेदवारांसाठी भारतीय भाषेवरील पेपर अ अनिवार्य नसेल.

iv. भारतीय भाषेवरील पेपर - अ हा बेंचमार्क अपंगत्व असलेल्या (फक्त श्रवणदोष उप-वर्गातील) उमेदवारांसाठी अनिवार्य राहणार नाही, परंतु जर त्यांना संबंधित शिक्षण मंडळ/विद्यापीठाने दुसऱ्या किंवा तिसऱ्या भाषा अभ्यासक्रमांमधून अशी सूट दिली असेल. आयोगाकडे अशी सूट मिळविण्यासाठी उमेदवाराने या संदर्भात एक हमीपत्र/स्वघोषणापत्र सादर करणे आवश्यक आहे.

v. पेपर I-VII साठी उमेदवारांनी मिळवलेले गुण केवळ गुणवत्ता क्रमवारीसाठी मोजले जातील. तथापि, यापैकी कोणत्याही किंवा सर्व पेपरमध्ये पात्रता गुण निश्चित करण्याचा अधिकार आयोगाला असेल.

vi. प्रादेशिक भाषा माध्यम/साहित्यासाठी, उमेदवारांनी वापरायच्या लिपी खालीलप्रमाणे असतील:-

| भाषा | लिपी | भाषा | लिपी |
|---|---|---|---|
| आसामी बंगाली बंगाली | आसामी | पंजाबी | गुरुमुखी |
| गुजराती | गुजराती | संस्कृत | देवनागरी |
| हिंदी | देवनागरी | सिंधी | देवनागरी किंवा अरबी |
| कन्नड | कन्नड | तमिळ | तमिळ |
| काश्मिरी | पर्शियन | तेलुगू | तेलुगू |
| कोकणी | देवनागरी | उर्दू | फारसी |
| मल्याळम | मल्याळम | बोडो | देवनागरी |
| मणिपुरी | बंगाली किंवा मीतेई मायेक | डोगरी | देवनागरी |
| मराठी | देवनागरी | मैथिली | देवनागरी |
| नेपाळी | देवनागरी | संथाली | देवनागरी किंवा ओलचिकी |
| ओडिया | ओडिया | | |

**टीप १:** संथाली भाषेसाठी, प्रश्नपत्रिका देवनागरी लिपीत छापली जाईल; परंतु उमेदवारांना देवनागरी लिपीत किंवा ओलचिकीत उत्तरे देण्याचे स्वातंत्र्य असेल.

**टीप २:** मणिपुरी भाषेसाठी, प्रश्नपत्रिका बंगाली लिपीत छापली जाईल; परंतु उमेदवारांना बंगाली लिपीत किंवा मेइतेई मायक लिपीत उत्तरे देण्याचे स्वातंत्र्य असेल.

## ➢ मुख्य परीक्षेसाठी ऐच्छिक विषयांची यादी:

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| 1. | कृषी | 2. | पशुसंवर्धन आणि पशुवैद्यकीय | 3. | मानववंशशास्त्र |
| 4. | वनस्पतिशास्त्र | 5. | रसायनशास्त्र | 6. | स्थापत्य अभियांत्रिकी |
| 7. | वाणिज्य आणि लेखा | 8. | अर्थशास्त्र | 9. | विद्युत अभियांत्रिकी |
| 10. | भूगोल | 11. | भूशास्त्र | 12. | इतिहास |
| 13. | कायदा | 14. | व्यवस्थापन | 15. | गणित |
| 16. | यांत्रिकी अभियांत्रिकी | 17. | वैद्यकशास्त्र | 18. | तत्वज्ञान |
| 19. | भौतिकशास्त्र | 20. | राज्यशास्त्र आणि आंतरराष्ट्रीय संबंध | 21. | मानसशास्त्र |
| 22. | लोक प्रशासन | 23. | समाजशास्त्र | 24. | सांख्यिकी |
| 25. | प्राणीशास्त्र | 26. | **खालीलपैकी कोणत्याही एका भाषेतील साहित्य:** आसामी, बंगाली, बोडो, डोगरी, गुजराती, हिंदी, कन्नड, काश्मिरी, कोकणी, मैथिली, मल्याळम, मणिपुरी, मराठी, नेपाळी, ओडिया, पंजाबी, संस्कृत, संथाली, सिंधी, तमिळ, तेलुगू, उर्दू आणि इंग्रजी. | | |

**टीप:**

i. परीक्षेसाठी प्रश्नपत्रिका पारंपारिक (वर्णनात्मक) प्रकारच्या असतील.

ii. प्रत्येक पेपर तीन तासांचा असेल.

iii. उमेदवारांना पात्रता भाषा विषय (पेपर-अ आणि पेपर-ब) वगळता सर्व विषयांचे पेपर भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या, कोणत्याही एका भाषेत किंवा इंग्रजीमध्ये सोडवता येतील. जरी उमेदवारांनी पात्रता भाषा प्रश्नपत्रिका (पेपर-अ आणि पेपर-ब) वगळता, पेपर १ ते ५ भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही एका भाषेत लिहिण्याचा पर्याय निवडला असेल, तरी त्याला वैकल्पिक विषयाचे पेपर इंग्रजी मध्ये लिहिण्याचा पर्याय असेल.

iv. वर नमूद केलेल्या भारतीय संविधानाच्या आठव्या अनुसूचीमध्ये समाविष्ट असलेल्या कोणत्याही एका भाषेत उत्तरे लिहीण्याचा पर्याय वापरणाऱ्या उमेदवारांना जर हवे असेल तर, त्यांनी निवडलेल्या भाषेतील शब्दां व्यतिरिक्त, केवळ तांत्रिक संज्ञांचे वर्णन इंग्रजी देता येईल, त्यासाठी कंसाचा वापर करावा. तथापि, उमेदवारांनी हे लक्षात ठेवावे की जर त्यांनी वरील नियमाचा गैरवापर केला तर, त्यांना मिळालेल्या एकूण गुणां मधून काही गुण वजा केले जातील. तसेच अत्यंत टोकाच्या प्रकरणांमध्ये; उमेदवाराने अनधिकृत माध्यमात लिखाण केले असे ठरवून, मूल्यांकन केले जाणार नाही.

v. उमेदवारांनी हे लक्षात ठेवावे की जर उत्तर लिखाणात कोणतीही असंबद्ध बाब/चिन्हे/खुणा इत्यादी लिहिलेली आढळली, जी कोणत्याही प्रश्न/उत्तराशी संबंधित नसतील आणि/किंवा उमेदवाराची ओळख उघड करण्याची क्षमता असेलेले असतील, तर आयोग उमेदवाराला अन्यथा मिळालेल्या एकूण गुणांमधून गुण वजा करण्याचा दंड आकारेल किंवा या कारणास्तव सदर उत्तरांचे मूल्यांकन करणार नाही.

vi. प्रश्नपत्रिका (भाषा साहित्याच्या पेपर्स व्यतिरिक्त) फक्त हिंदी आणि इंग्रजीमध्येच दिल्या जातील.

## सामान्य सूचना (प्राथमिक आणि मुख्य परीक्षा)

(i) उमेदवारांनी स्वतःच्या हाताने प्रश्नपत्रिका लिहिणे आवश्यक आहे. कोणत्याही परिस्थितीत त्यांना उत्तरे लिहिण्यासाठी लेखकाची मदत घेता येणार नाही. तथापि, अंधत्व, हालचाल अक्षमता (दोन्ही हात प्रभावित) आणि सेरेब्रल पाल्सी या श्रेणीतील बेंचमार्क अपंगत्व असलेल्या व्यक्तींना लेखनिकाची सुविधा मिळेल. आरपीडब्ल्यूडी कायदा, २०१६ च्या कलम २ (आर) अंतर्गत परिभाषित केल्याप्रमाणे बेंचमार्क अपंगत्व असलेल्या इतर श्रेणीतील व्यक्तींच्या बाबतीत, असे उमेदवार लेखनिकाची सुविधा मिळविण्यास पात्र असतील. त्यासाठी संबंधित उमेदवारास लिहिण्याची शारीरिक मर्यादा आहे आणि परीक्षेसाठी लेखनिकाची मदत अत्यावशक आहे, असे मुख्य वैद्यकीय अधिकारी/नागरी शल्यचिकित्सक/वैद्यकीय अधीक्षक (सरकारी आरोग्य सेवा संस्था) यांच्याकडून प्रमाणपत्र सादर करणे गरजेचे आहे.

RPwD कायदा, २०१६ च्या कलम २(s) च्या व्याख्येअंतर्गत समाविष्ट असलेल्या परंतु सदर कायद्याच्या कलम २(r) च्या व्याख्येअंतर्गत समाविष्ट नसलेल्या, विशिष्ट अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी, म्हणजेच ४०% पेक्षा कमी अपंगत्व असलेल्या आणि लिहिण्यात अडचण असलेले उमेदवार लेखनिकाच्या सुविधेसाठी पात्रता असतील, जर संबंधित उमेदवाराला लिहिण्याची मर्यादा असेल आणि त्या उमेदवाराने सरकारी आरोग्य सेवा संस्थेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणपत्र जमा केले तर त्यांना लेखनिक मिळवता येईल.

(ii) उमेदवारांना स्वतःचा लेखक निवडण्याचा किंवा आयोगाला त्यासाठी विनंती करण्याचा अधिकार आहे. स्वतः आणलेल्या लेखनिकाची माहिती ऑनलाइन अर्ज भरताना द्यावी लागेल. त्यासंदर्भातील फॉर्मचा नमूना दरवर्षीच्या जाहिरातीत दिलेला असतो.

(iii) आयोगाच्या लेखनिकाची तसेच स्वतःच्या लेखकाची पात्रता परीक्षेच्या किमान पात्रता निकषांपेक्षा जास्त असणार नाही. तथापि, लेखनिकाची पात्रता नेहमीच मॅट्रिक किंवा त्याहून अधिक असावी.

(iv) अंधत्व, हालचाल अक्षमता (दोन्ही हात प्रभावित) आणि सेरेब्रल पाल्सी या श्रेणीतील बेंचमार्क अपंगत्व असलेले उमेदवार परीक्षे कालावधीच्या प्रति तास वीस मिनिटांच्या भरपाई वेळेसाठी पात्र असतील. बेंचमार्क अपांगत्वाच्या इतर श्रेणींमध्ये असलेले उमेदवार देखील या सुविधेसाठी पात्र असतील. त्यासाठी संबंधित व्यक्तीला मुख्य वैद्यकीय अधिकारी/नागरी शल्यचिकित्सक/सरकारी आरोग्य सेवा संस्थेच्या वैद्यकीय अधीक्षकांकडून लिहिण्याची शारीरिक मर्यादा असल्याचे प्रमाणपत्र सादर करावे लागेल.

RPwD कायदा, २०१६ च्या कलम २(s) च्या व्याख्येअंतर्गत समाविष्ट असलेल्या परंतु सदर कायद्याच्या कलम २(r) च्या व्याख्येअंतर्गत समाविष्ट नसलेल्या, विशिष्ट अपंगत्व असलेल्या व्यक्तींसाठी, म्हणजेच ४०% पेक्षा कमी अपंगत्व असलेल्या आणि लिहिण्यात अडचण असलेले उमेदवार भरपाई वेळेसाठी पात्र असतील, जर संबंधित उमेदवाराला लिहिण्याची मर्यादा असेल आणि त्या उमेदवाराने सरकारी आरोग्य सेवा संस्थेच्या सक्षम वैद्यकीय अधिकाऱ्याकडून तसे प्रमाणपत्र जमा केले तर त्यांना भरपाई वेळ मिळवता येईल.\

(v) पात्र उमेदवारांची इच्छा असल्यास त्यांना लेखनिकाची सुविधा आणि/किंवा भरपाई वेळ प्रदान केला जाईल, जाईल.

## क. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी

1. उमेदवाराची मुलाखत एका बोर्डद्वारे घेतली जाईल, ज्यांच्याकडे उमेदवाराच्या कारकिर्दीचा रेकॉर्ड असेल. उमेदवाराला सामान्य स्वारस्याच्या बाबींवर प्रश्न विचारले जातील. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीचा उद्देश सक्षम आणि निःपक्षपाती निरीक्षकांच्या बोर्डाद्वारे सार्वजनिक सेवेतील कारकिर्दीसाठी उमेदवाराच्या वैयक्तिक योग्यतेचे मूल्यांकन करणे आहे. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी ही उमेदवाराच्या मानसिक क्षमतेचे मूल्यांकन करण्यासाठी असते. व्यापक अर्थाने हे केवळ बौद्धिक गुणांचेच नव्हे, तर सामाजिक जाणीव आणि चालू घडामोडींमधील रस यांचे देखील मूल्यांकन करण्यात येते. तसेच मानसिक सतर्कता, परिस्तिथी आत्मसात करण्याची क्षमता, स्पष्ट आणि तार्किक विचार, निर्णयाचे संतुलन, आवडींची विविधता आणि खोली, सामाजिक एकसंधता आणि नेतृत्व करण्याची क्षमता, बौद्धिक आणि नैतिक सचोटी यासारखे काही गुण तपासले जातात.
2. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणीची पद्धत कठोर उलटतपासणी सारखी नसून, ती एक नैसर्गिक, निर्देशित आणि हेतुपुरस्सर संभाषण प्रक्रिया आहे, जी उमेदवाराच्या मानसिक गुणांना प्रकट करण्यासाठी वापरली जाते.
3. मुलाखत/व्यक्तिमत्व चाचणी ही उमेदवारांच्या विशेष किंवा सामान्य ज्ञानाची चाचणी नाही जी त्यांच्या लेखी पेपर्सद्वारे आधीच तपासली गेली आहे. उमेदवारांनी केवळ त्यांच्या शैक्षणिक अभ्यासाच्या विशेष विषयांमध्येच नव्हे तर त्यांच्या स्वतःच्या राज्यात किंवा देशाबाहेर तसेच त्यांच्या आजूबाजूला घडणाऱ्या घटनांमध्ये तसेच आधुनिक विचारप्रवाहांमध्ये आणि सुशिक्षित तरुणांची उत्सुकता जागृत करणाऱ्या नवीन शोधांमध्ये बुद्धिमान रस घेतला पाहिजे अशी अपेक्षा आहे.

UPSC IN मराठी
··· स्वप्नपूर्ती मातृभाषेतून ···